**"ऑक्टोबर २०१६" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

## (अ) शासन निर्णय / अधिसूचना

- सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या कार्मिक, लोकतक्रारी तथा निवृत्तीवेतन मंत्रालय, निवृत्तीवेतन व निवृत्तीवेतनधारक कल्याण विभागाचा निर्णय क्रमांक-३८/३७/२०१६-पी ॲण्ड पीडब्ल्यू (ए), दिनांक ४ ऑगस्ट २०१६ च्या ज्ञापनान्वये प्रसृत केलेल्या सुधारणा अखिल भारतीय सेवा (मृत्यू-नि-सेवानिवृत्ती लाभ) नियम १९५८ लागू असलेल्या अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना लागू करण्यात आल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील दिनांक १ जानेवारी २०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनात सुधारणा करण्यास दिनांक १ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच दिनांक १ जानेवारी २०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या आणि ३३ वर्षापेक्षा कमी अर्हताकारी सेवा आहे अशा निवृत्तीवेतनधारकांच्या संदर्भात सहाव्या वेतन आयोगानुसार करावयाची काही प्रकरणे अद्यापही प्रलंबित असल्याने, त्यांच्या निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान आदेश सुधारित करण्याबाबत पुनर्सूचना देण्यात आल्या आहेत.

  उक्त शासन निर्णयातील परिच्छेद-२(१) व ३(१) मधील ४ थ्या ओळीला दिनांक ५ ऑक्टोबर २०१६ रोजी शुद्धीपत्र निर्गमित करण्यात आले आहे.

- सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक-१४०२१/४/२०१६-एआयएस(II), दिनांक १ सप्टेंबर २०१६ अन्वये अखिल भारतीय सेवा (मृत्यू-नि-सेवानिवृत्ती लाभ) नियम १९५८ लागू असलेल्या अखिल भारतीय सेवतील अधिकाऱ्यांना केंद्र शासनाच्या कार्मिक, लोकतक्रारी तथा निवृत्तीवेतन मंत्रालय, निवृत्तीवेतन व निवृत्तीवेतनधारक कल्याण विभागाचा निर्णय क्रमांक-३८/३७/२०१६-पी ॲण्ड पीडब्ल्यू (ए)(i), दिनांक ४ ऑगस्ट २०१६ च्या ज्ञापनान्वये अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना लागू करण्यात आल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील दिनांक १ जानेवारी २०१६ व त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या / होणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनात सुधारणा करण्यास दिनांक १ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

- सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने दिनांक ८ सप्टेंबर २०१६, २३ सप्टेंबर २०१६ व २८ सप्टेंबर २०१६ च्या राजपत्रात प्रसिद्ध केलेली भारतीय प्रशासन सेवा (वेतन) नियम २०१६, भारतीय पोलीस सेवा (वेतन) नियम २०१६ आणि भारतीय वन सेवा (वेतन) नियम २०१६ च्या अधिसूचनांव्दारे प्रसृत केलेले नियम महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना लागू करण्यास दिनांक १ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या वेतन नियमांच्या अनुषंगोन या सेवेंतर्गत महाराष्ट्र संवर्गातील अधिकाऱ्यांचे वेतन दिनांक १ जानेवारी २०१६ पासून सुधारित करण्यात येऊन, सुधारित वेतन दिनांक १ ऑक्टोबर २०१६ पासून प्रदान करण्यास तसेच दिनांक १ जानेवारी २०१६ ते ३० सप्टेंबर २०१६ पर्यंतच्या कालावधीतील वेतन सुधारणेमुळे देय ठरणाऱ्या थकबाकीची १००% रक्कम माहे ऑक्टोबर २०१६ च्या वेतनातून रोखीने एकरकमी प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ च्या पत्रान्वये "Extension of scope of Department of Pension and Pensioners Welfare's OM regarding Simplification of pension process for permanently disabled children / siblings and dependent parents" to members of All India Services -reg या विषयाबाबतचे केंद्र शासनाच्या कार्मिक व लोक तक्रार व निवृत्तीवेतन मंत्रालयाचे पत्र व ऑफिस मेमोरेन्डम महाराष्ट्र संवर्गातील सर्व भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात आले आहे.

- दिनांक २७ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये, सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने अखिल भारतीय सेवेतील महाराष्ट्र संवर्गातील अधिकाऱ्यांना दिनांक १ जानेवारी २०१६ ते ३० सप्टेंबर २०१६ पर्यंतच्या कालावधीतील वेतन सुधारणेमुळे देय होणारी थकबाकीची पूर्ण रक्कम अथवा सदर थकबाकीचा काही भाग ऐच्छिकरित्या त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा करण्यास मुभा देण्यात आली आहे. सदर थकबाकीची पूर्ण रक्कम अथवा काही भाग ऐच्छिकरित्या

त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात या शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील तीन महिन्याच्या कालावधीत जमा करावयाचा आहे.

- दिनांक १९ ऑक्टोबर २०१६ च्या शासन अधिसूचनेन्वये “महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप (सुधारणा) नियम २०१६” प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यात महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम २०१५ च्या नियम-२ मधील तिसऱ्या परंतुकानंतर “*परंतु आणखी असे की, या नियमांची अंमलबजावणी गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवरील विक्रीकर विभागातील अधिकारी यांचेकरिता दिनांक १६ जुलै २०१६ पासून १ वर्षापर्यंत स्थगित ठेवण्यात येत आहे*” असे परंतुक समाविष्ट करण्यात आले आहे.

- सेवाविषयक बाबींविषयी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे मूळ अर्ज व विविध अर्ज दाखल होतात. त्या अर्जावर कार्यवाही करताना घ्यावयाची दक्षता, दाखल करावयाच्या शपथपत्रात उणिवा राहू नये तसेच मा.प्रशासकीय न्यायाधिकरणाची प्रकरणे कशी हाताळावीत याबाबत मंत्रालयीन विभागातील अधिकाऱ्यांना मा.न्यायमूर्ती श्री.अ.ह.जोशी, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिनांक २५ ऑक्टोबर २०१६ रोजी मंत्रालयातील परिषद सभागृहात मार्गदर्शनपर व्याख्यान दिले आहे.

**(ब) <u>प्रशिक्षण</u>**

- भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी दरवर्षी १ आठवडयाचे सक्तीचे सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम प्रशिक्षणास उपस्थित राहण्यासाठी जाताना करावयाची प्रशासकीय व्यवस्था करण्यासंदर्भातच्या सूचना दिनांक १० ऑक्टोबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

- १६ परिविक्षाधीन कक्ष अधिकाऱ्यांना एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ मधील टप्पा-४ अंतर्गत दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ ते २४ एप्रिल २०१७ या कालावधीत विभागतर्गत / जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी दिनांक १३ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये नियुक्त करण्यात आले आहे.

**(क) <u>पदोन्नती / निवडसूची / ज्येष्ठतासूची</u>**

- गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१६ रोजीची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची दिनांक ६ ऑक्टोबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

- दिनांक २९ ऑक्टोबर २०१६ च्या आदेशान्वये सहायक कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी सन २००८-०९ च्या निवडसूचीतून पात्र ठरलेल्या ३२ लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखकांना सदर पदावर नियमित पदोन्नती देण्यात आली असून, त्यांना पदोन्नतीचा नियमित दिनांक देण्यात आला आहे.

- २ सहायक कक्ष अधिकाऱ्यांना कक्ष अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. ४ उपसचिवांच्या पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेत अंशत: बदल करुन सुधारित पदस्थापना देण्यात आली आहे.

**(ड) <u>बदल्या / पदस्थापना</u>**

- “सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०१५” मधील शिफारसप्राप्त १ उमेदवाराचे मंत्रालयीन विभागात नियतवाटप करण्यात आले.

- लिपिक-टंकलेखक (मराठी /इंग्रजी) परीक्षा २०१५ ... महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांचे मंत्रालयीन विभागातील तसेच बृहल्मुंबईतील विविध कार्यालयातील लिपिक-टंकलेखक पदावर नियतवाटप केलेल्या अनुक्रमे दिनांक २८ व २९ सप्टेंबर २०१६ च्या शासन ज्ञापनातील परिच्छेद-२ (२) ला दिनांक २१ ऑक्टोबर २०१६ रोजी शुद्धीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

- १ अवर सचिवाचे निलंबन रद्द करुन, त्यांना निलंबनानंतर अवर सचिव पदी पुनर्स्थापित करण्यात आले आहे.

- भारतीय प्रशासन सेवेतील ११ अधिकाऱ्यांच्या (१०+१) दिनांक १३ व २५ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये बदल्या / पदस्थापना करण्यात आल्या आहेत.

- सहसचिव, उपसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी या संवर्गातील अनुक्रमे १, ४, ४, ७ अशा १६ अधिकाऱ्यांच्या बदल्या / प्रत्यावर्तन करण्यात आल्या आहेत. कक्ष अधिकारी संवर्गातील २ अधिकाऱ्यांच्या बदल्या स्थगित / रद्द करण्यात आल्या. उपसचिव, कक्ष अधिकारी या संवर्गातील अनुक्रमे २, २ अशा ४ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात आल्या आहेत.

***********